प्रेसनोट

दिनांक ०६/०५/२०२५

ॲन्टी करप्शन विभाग, नवी मुंबई यांची यशस्वी सापळा कारवाई

| | | | |
|---|---|---|---|
| १. | विभाग/घटक | :- | ॲन्टी करप्शन ब्युरो, नवी मुंबई |
| २. | ठाणे दैनंदिनी नोंद क्रमांक . | :- | रोहा पोलीस ठाणे, जि.रायगड, ठाणे दैनंदिनी नोंद क्रमांक 32/२०२५ वेळ 18:13 दिनांक ०६/०५/२०२५ |
| ३ | लोकसेवकाचे नाव व कार्यालय | | फिरोज ईलाही मुजावर वय ३० वर्ष, तलाठी (वर्ग ३) तलाठी सजा भालगांव, ता. रोहा, जि. रायगड<br>रा. माउली बिल्डींग रूम नं. १६, अष्टमी गाव, ता. रोहा, जि. रायगड |
| ४. | लाचेची मागणी रक्कम | :- | रु. १०,०००/- |
| ५ | स्विकारलेली रक्कम | :- | रु. १०,०००/- |
| ६ | थोडक्यात हकिगत | | यातील तक्रारदार यांनी दि.२३/०४/२०२५ रोजी लाप्रवि, नवी मुंबई कार्यालय येथे येवून तक्रार दिली की, यातील तक्रारदार यांना मौजे कांडणे, ता. रोहा, जि. रायगड येथील सर्व्हे नं. ४१/१, ३९/१/अ, ३९/२, २२५ इत्यादी सर्व्हे नंबर मधील सातबा-यावर जमीनीची मालक अनिल फुलचंद गर्ग यांच्या मृत्य पश्चात वारस नोंद घेण्याचे काम गर्ग यांची पत्नी व मुलगा यांनी तक्रारदार यांना दिले असता त्या प्रमाणे तक्रारदार यांनी नमुद सर्व्हेच्या सातबा-यावर वारस नोंद करणेकरीता सज्जा भालगांव, ता.रोहा, जिल्हा रायगड येथे अर्ज दाखल केला असता सदर वारस नोंदीच्या कामाकरीता लोकसेवक तलाठी नामे फिरोज ईलाही मुजावर वय ३० वर्ष, (वर्ग ३) यांनी तक्रारदार यांचेकडे रु.१५,०००/- लाचेची मागणी करुन त्यातील रु.५०००/- रक्कम यापुर्वी तक्रारदार यांचे परीचीत नजीर यांच्याकडुन गुगल पे व्दारे स्विकारुन उर्वरीत लाचेची रक्कम रू. १०,०००/- सातबारास नोंदीवर वारस नोंद केलेल्या कामाच्या बदल्यात मागणी करीत असल्याची तक्रार दिली होती. त्या अनुषंगाने दिनांक २३/०४/२०२५ रोजी पंच साक्षीरासमक्ष केलेल्या पडताळणी मध्ये रु.१०,०००/- लाचेची मागणी केल्याचे नष्पन्न झाले.<br>त्याप्रमाणे आज दिनांक ०६/०५/२०२५ रोजी सापळा कारवाई दरम्यान आलोसे फिरोज ईलाही मुजावर, तलाठी, वय ३० वर्ष, (वर्ग ३) तलाठी सजा भालगांव, ता. रोहा, जि. रायगड यांनी तक्रारदार यांच्याकडून रु. १०,०००/- लाचेची रक्कम त्यांचे कार्यालयामध्ये स्विकारली असता त्यांना पंचासमक्ष रंगेहाथ पकडण्यात आलेले आहे. लोकसेवक यांना ताब्यात घेवून त्यांच्याविरुध्द भ्र.प्र. कायद्यान्वये गुन्हा नोंद करण्याची कारवाई सुरु आहे. |

लाचलुचपत प्रतिबंध विभागा तर्फे नागरिकांना आवाहन करण्यात येते की, भ्रष्टाचारासंबंधी काही माहिती असल्यास अगर लाच मागणा-या लोकसेवकाविरूध्द तक्रार असल्यास लाचलुचपत प्रतिबंध कार्यालय, ठाणे परिक्षेत्र, ठाणे यांचेशी संपर्क करावा.

मार्गदर्शन अधिकारी:-मा.श्री. शिवराज पाटील,पोलीस अधीक्षक ,ॲन्टी करप्शन ब्युरो,ठाणे परिक्षेत्र,ठाणे
मा. श्री. संजय गोविलकर, अपर पोलीस अधीक्षक, ॲन्टी करप्शन ब्युरो, ठाणे परिक्षेत्र, ठाणे
मा.श्री. सुहास शिंदे, अपर पोलीस अधीक्षक, ॲन्टी करप्शन ब्युरो, ठाणे परिक्षेत्र, ठाणे

संपर्क पत्ता :-ला.प्र.वि. नवी मुंबई मध्यवर्ती सुविधा इमारत फळमार्केट, तुर्भे, से.न.१९, एपीएमसी नवी मुंबई, ला.प्र.वि. ठाणे, मध्यवर्ती कारागृहासमोर, ठाणे पश्चिम, ४००६०१
संकेत स्थळ :-acbmaharashtra@mahapolice.gov.in
ई-मेल - spacbthane@mahapolice.gov.in.
ऑनलाईन तक्रार ॲप्लीकेशन :-acbmaharashtra.net
टोलफ्रीनं. :-१०६४ दुरध्वनी क्र. :-०२२-२०८१३५९८/२०८१३५९९
ॲसीबी. नवी मुंबई कार्यालय दुरध्वनी क. -२७८३३३६४/८३५६८२६४०३